**" BEST DETECTION OF THE MONTH-JULY 2019"**

दिनांक **१६/०९/२०१९** रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या हस्ते भरूचा सभाग्रह, सहावा मजला, नविन पोलीस आयुक्त इमारत,पोलीस आयुक्त कार्यालय मुंबई येथे आयोजीत करण्यात आलेल्या गुन्हे परिषदेत बक्षिस वितरण कार्यक्रमात सोबत जोडण्यात आलेल्या माहे **जुलै** —२०१९ या महिन्याचा **" BEST DETECTION OF THE MONTH "** चा पुरस्कार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आला आहे.

## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जुलै — २०१९

| ०१ | माटुंगा पोलीस ठाणे परिमंडळ—४ | गु.र.क्र. १३९/१९ कलम ३०२ भा.द.वि. |
|---|---|---|

**''खून''**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** गुन्हयाची थोडक्यात हकीगत अशी की, यातील फिर्यादी पोउनि थेतले हे दि. २९/०६/१९ रोजी दिवसपाळी कर्तव्याकरीता माटुंगा मोबाईल —१ या गस्ती वाहनावर रूजु होऊन स्टाफसह कर्तव्य बजावत असताना सकाळी ११.२८ वा. मुख्य नियंत्रण कक्ष, मुंबई येथुन संदेश प्राप्त झाला की, '' रेल्वे टिकिट घराजवळ, टिळक ब्रिज खाली, दादर स्टेशन (पु), मुंबई येथे एक जखमी इसम पडला असुन पोलीस मदत हवी आहे.'' म्हणुन फिर्यादी व स्टॉफ तात्काळ महेश्वरी सर्कल येथून निघुन घटनास्थळी पोहचलो असता सदर ठिकाणी दादर रेल्वे पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार व स्थानिक लोक जमलेले दिसले. घटनास्थळी रक्ताचा पाट पावसाच्या पाण्याबरोबर वाहत असल्याचे दिसले.

नमुद ठिकाणी उपस्थित असलेले रेल्वे पोलीसांनी केलेल्या प्राथमिक चौकशीवरून फिर्यादी यांना माहिती दिली की, '' नमुद जखमी इसमाबाबतची घटना ही अंदाजे १०.०० ते ११.०० वा. च्या दरम्यान घडली आहे. जखमी इसमास ११.१५ वा. सुमारास १०८ नंबरच्या ॲम्बुलन्सने दादर रेल्वे पोलीस स्टेशनच्या पोलीस अंमलदार यांच्या मदतीने सायन रूग्णालय येथे उपचाराकरीता नेण्यात आले आहे.'' त्यानंतर फिर्यादी हे स्टॉफसह नियत्रंण कक्षाच्या आदेशाने सायन रूग्णालय येथे गेले असता तेथे आप्तकालीन कक्षामध्ये सदर जखमी इसमावर तेथील डॉक्टर उपचार करीत असल्याचे दिसुन आले. नमुद जखमी इसमाची पाहणी केली असता त्यांचा मानेवर डाव्या बाजुस अंदाजे ५ इंच आकाराची वार केल्याची कापीव जखम दिसून आली. नमुद इसमावर सायन हॉस्पीटल येथे उपचार चालु असताना त्यास १३.४५ वा. मयत झाल्याचे डॉक्टरांनी फिर्यादीला सांगितले.

सदरची माहिती पोउनि थेतले यांनी तात्काळ माटुंगा पोलीस ठाणेस दिली असता ठाणे अंमलदार म.पोउनि जगताप हे पोलीस पथकासह सायन हॉस्पीटलमध्ये रवाना झाले व सदर प्रकरणी अपमृत्य क्र. ४५/१९ कलम १७४ सीआरपीसी नोंद करण्यात आला. मयत अनोळखी इसमाचा दोन पंचासमक्ष इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात आला आहे. तसेच उपचारादरम्यान मयत इसमाच्या अंगावरील रक्ताने माखलेले कपडे— १) टि—शर्ट, २) पॅन्ट, ३) अंडरवेअर, ४) कमरेचा बेल्ट हे पंचनाम्याअंतर्गत जप्त केले. सदरची नोंद भादंवि मुद्देमाल क्र. १४२/१९ दि.

२९/६/१९ रोजी अन्वये घेण्यात आली आहे.

तरी दि. २९/६/१९ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० वा. च्या दरम्यान बंद रेल्वे तिकीट घराजवळ, टिळक ब्रिज खाली, दादर स्टेशन (पु), मुंबई येथे कोणीतरी अज्ञात इसमाने धारधार शस्त्राने वर नमुद अनोळखी इसमाच्या मानेवर डाव्या बाजुस वार करून त्याचा खुन केला आहे. म्हणुन अज्ञात इसमाविरूद्ध सरकारतर्फे कायदेशिर कारवाई होण्याकरीता पोउनि थेतले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उपरोक्त गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री. प्रकाश काशीराम थेतले वय ३५ वर्षे, |
| **बळीत/मयत** | :— | मुकेश भगवान इंगळे वय ३४ वर्षे, धंदा हमाली, |
| **आरोपी अटक व दिनांक** | | **विरभद्रया मल्लीनाथ हिरेमठ वय २३ वर्षे,**<br>२१/०७/२०१९ |
| **खुनाचा उद्देश** | :— | **दारू पिताना शिवीगाळ केल्यामुळे** |

**तपास कौशल्य** :— मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ— ४ यांनी व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, माटुंगा विभाग श्रीमती अस्मिता भोसले यांनी सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने आरोपीताचा शोध घेवुन तपास करण्याबाबत आदेशित केले त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भरत भोईटे पोलीस निरीक्षक (गुन्हे), विनय पाटणकर, पोनि सरला वसावे तपासी अधिकारी यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. अंबरगे, पोउनि प्रशांत कांबळे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार तसेच पोउनि मारूती शेळके व सायबर गुन्हे प्रतिबंधक पथक व पोलीस उपनिरीक्षक रामदास कदम मध्य प्रादेशिक विभाग यांची बैठक घेवुन गुन्हयाचा आढावा घेवुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत आदेशित केले. त्यांचे मार्गदर्शक सूचनाप्रमाणे वर नमुद गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार तसेच यांना मदतीला देवून नमुद पथकांस वेगवेगळया सूचना देवुन तपास करण्याबाबत आदेशित केले.

गुन्हयाचे घटनास्थळ हे दादर पुर्व स्टेशनच्या बाजूला बंद असलेल्या तिकीट घरासमोर आहे. ते स्टेशनच्या बाजूस असणाऱ्या रोडच्या कोपऱ्यात आहे. तेथे सहसा गर्दी नसते. दि. २९/०६/२०१९ रोजी सकाळी पासून पाऊस चालू होता. त्यामुळे घटनास्थळाजवळ कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळून आला नाही. दादर स्टेशन सेंट्रल येथील प्लॅटफॉर्म क्र ०७ व ०८ याचे जिन्याच्या दिशेने एक सीसीटीव्ही कॅमेरा दिसून आला. तसेच घटनास्थळाचे बाजूस असणाऱ्या जिन्यावर एक सीसीटीव्ही कॅमेरा दिसून आला. प्लॅटफॉर्म क्र. ०७ व ०८ या कॅमेऱ्याचे फुटेज पाहीले असता, तेथे मयत इसम हा यातील आरोपी सोबत तेथे आलेला दिसून आला तसेच तेथे आरोपी इसमाने मयत इसमावर याचेवर वार करून पळून गेल्याचे दिसले.

मयत इसमाचे इन्क्वेस्ट पंचनाम्यावेळी त्याचे खिशात किंवा अंगावर त्याचे नाव किंवा त्याची माहीती मिळून येईल अशी कोणतीही वस्तू मिळून आली नाही. त्यामुळे अनोळखी इसमाचा अपमृत्यू नोंद करण्यात आला होता. मयत इसमाचे फोटो काढून ते तपास पथकातील सर्व

अधिकारी व अंमलदार यांना देण्यात आले. सदरच्या फोटोवरून त्याची ओळख पटविण्यासाठी दादर स्टेशन परीसरात नेहमी असणाऱ्या लोकांना, कचरा गोळा करणारे इसम, प्लॅटफॉर्मवरील स्टॉलधारक, हमाल, रेल्वे कर्मचारी, रेल्वे कॉलनीमधील लोक, स्टेशन परीसरात ब्रीजच्या बाजूला राहणारे लोक यांना दाखविण्यात आला परंतू मयत इसमाबाबत कोणतीही माहीती मिळून येत नव्हती.

तपास पथकातील अंमलदार यांचेकडून दादर पुर्व परिसरातील हिंदू कॉलनी, दादर टी टी सर्कल, दादर रेल्वे, दादर प. येथील मार्केट, भाजी मार्केट, मच्छी मार्केट येथील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम चालू होते. त्याचवेळी दादर पश्चिम येथील मार्केटमध्ये फिरून मयत इसमाची ओळख पटविण्यासाठी जनता भाजी मार्केटमध्ये सर्व हमाल यांचेकडे चौकशी चालू असताना एका इसमाने मयत इसमाचा फोटो पाहून त्यास ओळखले व त्याचे नाव मुकेश असल्याचे सांगीतले. त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता, त्यांचेकडून मयत इसमाचे भावाचा मोबाईल क्रमांक मिळाला. त्यांचेशी संपर्क करून झालेल्या घटनेची माहीती दिली. त्यांनतर दुसऱ्या दिवशी दि. ०३/०७/२०१९ रोजी मयत इसमाचा मृतदेह हा त्याचे नातेवाईकांना अंत्यसंस्कारासाठी देण्यात आला. त्यांचेकडे चौकशी केली असता, त्यांचेकडून संशयित आरोपीबाबत कोणतीही माहीती मिळून आली नाही. एक तपास पथक मयत इसमाचे मुळ गावी मलकापूर बुलढाणा येथे पाठविण्यात आले परंतू तेथून देखील गुन्हा उघडकीस येण्याच्या दृष्टीने कोणतीही उपयुक्त माहीती मिळाली नाही.

नमुद गुन्हयाचे तपासामध्ये पाहणी केलेल्या दादर रेल्वे स्टेशनवरील सीसीटीव्ही कॅमरे व दादर पश्चिम येथील मार्केटमधील कॅमेरे यामध्ये मयत इसम व त्याचेसोबत असणारा संशयित आरोपी हा दिसून आला होता. त्याचे फोटो काढण्यात आले व ते फोटो शॉपमधून व्यवस्थित करून घेण्यात आले. त्याचे आधारे संशयित आरोपीचा शोध घेण्याचे काम चालू करण्यात आले. पो.नि. पाटणकर (गुन्हे) यांनी संशयित आरोपीचे वेगवेगळे फोटो एकत्र करून त्यावरून स्केच तयार करण्यासाठी कुर्ला येथील खाजगी इसम नामे नितीन म. यादव यांची मदत घेतली व त्यांचे मदतीने संशयित आरोपीचा स्केच तयार करण्यात आला. संशयित आरोपीचा स्केच व फोटो यांच्या आधारे त्याची ओळख पटविण्यासाठी सर्व तपास पथके रात्रंदिवस दादर पुर्व येथील बाजारपेठ, सायन कोळीवाडा, आर.ए.के रोड, अॅन्टॉपहिल, वडाळा, नायगाव धारावी, माहीम, दादर पश्चिम, भाजी मार्केट, मच्छी मार्केट इत्यादी ठिकाणी फिरून आरोपीची ओळख पटविण्यासाठी लोकांकडे विचारणा करीत होते, परंतू आरोपीबाबत कोणतीही माहीती मिळून येत नव्हती.

सीसीटीव्ही फुटेज तपासत असताना यातील आरोपीने सदरचा गुन्हा केल्यानंतर ज्या मार्गाने तो पळून गेला होता. तो मार्ग समजला होता. आरोपी हा हिंदू कॉलनी मधील गल्ली नं.०१ मधून पारसी दुध डेअरीच्या दिशेन व त्यानंतर दादर टी टी सर्कल येथे पळून गेला होता. दादर टी. टी. सर्कल वरून तो कोणत्या दिशेने गेला होता याबाबत कोणतीही माहीती मिळून येत नव्हती. त्यावेळी दादर टी. टी. सर्कलवर असलेल्या पॅटर्न कापड दुकानाच्या सीसीटीव्हीमध्ये अस्पष्टपणे तो सर्कलवरून ज्योती हॉटेलच्या दिशेने गेल्याचे दिसले. त्यामुळे दादर टी. टी. सर्कल वरील प्रितम जंक्शनच्या दिशेने जाताना त्या मार्गावरील सर्व सरकारी व खाजगी सीसीटीव्ही कॅमेरे पोउनि मारूती

शेळके व पोशिक्र. ०६११३६/पवार यांनी तपासून पाहीले. त्यावेळी ए टू झेड या कापड दुकानाच्या बाहेरील बाजूच्या दोन्ही कॅमेऱ्यामध्ये संशयित आरोपी दिसून आला. त्यानंतर तोच संशयित आरोपी बाबूभाई भगवानजी कापड दुकान याच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये संशयित आरोपी फोनवर बोलताना दिसून आला. त्यांनतर तो पुढे लक्ष्मी ट्रॅव्हल्स याच्या कॅमेऱ्यामध्ये आरोपी पुन्हा फोनवर बोलत असल्याचे दिसून आले. त्यामुळे सदर ठिकाणावरील डम डेटा काढण्यात आला. सदरचा डेटा प्राप्त होताच तो श्री मनोज दुबे यांचेकडून ॲनालिसीस करून घेण्यात आला. त्यांनी एकून १८ संशयित मोबाईल क्रमांक दिले. सदर मोबाईल क्रमांकाचे एसडीआर काढून त्यांची पडताळणी करण्यात आली परंतू त्यामध्ये संशयित आरोपी नसल्याचे समजले. त्यानंतर डम डेटा बाबत श्री मनोज दुबे यांचेशी पुन्हा चर्चा करून अदययावत मशीनचा वापर करून दादर टी टी सर्कल ते दादर एशियाड बस स्थानक या दरम्यानच्या सेल आय डी काढण्यात आल्या व त्यांचा डम डेटा घेण्यात आला. सदर डमडेटा हा दादर पुर्व व दादर रेल्वे स्टेशन या रहदारीच्या व गर्दीच्या परिसरातील असल्यामुळे त्यामध्ये सुमारे २.५ लाख ते ३ लाख मोबाईल कॉल असल्याचे दिसुन येत होते. सदरचा डमडेटा ॲनॅलीसीस करणे अवघड असल्याने तो डम डेटा पुन्हा श्री मनोज दुबे यांचेकडून ॲनालिसीस करून घेतला. त्यांनी त्यामधून एकून ६३ मोबाईल क्रमांक हे संशयित म्हणून दिले. त्यामधून देखील संशयित आरोपीने साधा मोबाईल फोन वापरला असल्याचे दिसून आले होते. संशयित मोबाईल क्रमांकाचे सीडीआर तात्काळ पोउपनि रामदास कदम यांनी मागवून घेतले. पोउपनि मारूती शेळके व पोउपनि रामदास कदम यांनी त्या प्राप्त सीडीआरचे ॲनालिसीस करून त्यामधून एक मोबाईल क्रमांक धारक हा संशयित असल्याबाबत व.पो.नि. भोईटे व वरिष्ठांना सांगीतले. वरिष्ठांचे परवानगीने त्या मोबाईल क्रमांक धारकाचे फिजीकल व्हेरीफिकेशन करण्यासाठी व त्याचा शोध घेण्यासाठी पो.नि.पाटणकर, पोउपनि मारूती शेळके, पोउपनि प्रशांत कांबळे, पो.शि.क्र. ०६,११३६/ संतोष पवार, ०७,१०५८/विकास मोरे, ०३,५६५/विनोद पवार, ०९१६९०/गजभारे यांची टिम दि. १९/०७/२०१९ रोजी रात्री सोलापूर येथे रवाना झाली होती. त्यांनी यातील संशयित इसमाची खात्री झाल्यांनतर त्यास शेळगी, सोलापूर येथून ताब्यात घेतले संशयित इसम नामे विरभद्रया मल्लीनाथ हिरेमठ वय २३ वर्षे धंदा हमाली रा.ठी. ३/ए, भगवान नगर, मित्र नगर, शेळगी, सोलापूर यास ताब्यात घेतले. त्याला विश्वासात घेवून त्याच्याकडे कौशल्यपुर्ण चौकशी केली असता त्याने खूनाची कबूली दिली. म्हणून त्याला ताब्यात घेवून माटुंगा पोलीस ठाण्यास आणण्यात आले व दि. २०/०७/२०१९ रोजी सदर गुन्हयात रितसर अटक करण्यात आली.

➢ सदरचा गुन्हा हा भरपावसामध्ये कमी वर्दळीच्या ठिकाणी झाला होता. पावसामुळे रस्त्यावर लोक नव्हते. त्यामुळे मयत व आरोपी याबाबत माहीती देणारे कोणीही मिळून येत नव्हते. मयताच्या अंगावर कोणतीही ओळख पटविणारी वस्तू मिळून आली नव्हती. तरीही मयत इसम व आरोपी यांचा सीसीटीव्ही फुटेजमधील अस्पष्ट दिसणारा फोटो दादर पश्चिम, दादर पुर्व, दादर रेल्वे स्टेशन, दादर पश्चिम येथील सर्व मार्केटमध्ये दाखवून मयत इसमाबद्दल माहीती मिळवून त्याचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी ताब्यात देण्यात आला. आरोपी हा मुंबईमध्ये राहणारा नसताना सुध्दा केवळ सीसीटीव्ही फुटेज व डमडेटा याच्या आधारे कठोर परीश्रम घेवून चिकाटीने तांत्रिक तपास करून आरोपी शोधून काढला व त्यास अटक केले.

यासाठी दादर पुर्व, दादर पश्चिम येथील मार्केट, दादर रेल्वे स्टेशन अशा वेगवेगळया ठिकाणचे ६० ते ७० सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. तसेच दादर पश्चिम येथील भाजी मार्केट, कापड मार्केट, मच्छी मार्केट येथील सुमारे ५०० ते ५५० हमाल व व्यापारी यांच्याकडे केलेल्या चौकशी केली आहे.तसेच २.५ लाख ते ३ लाख मोबाईल कॉलचे रेकॉर्ड तपासले आहे. अनोळखी इसमाच्या मृतदेहाची ओळख पटवून क्लिस्ट व किचकट अशा गंभीर गुन्हयाची तांत्रिक तपासाचे आधारे माटुंगा पोलीस ठाण्याचे तपास पथकाने उकल करून यातील आरोपीताचा शोध घेवून शेळगी सोलापूर येथून अटक करून मुंबई पोलीस दलाची जनमानसात असलेली प्रतिमा उंचावण्याचे काम केले आहे.

- सदरचा संवेदनशील गुन्हा उघड झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी माहे जुलै–**२०१९** चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

- **मांटुगा पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| | |
|---|---|
| वरिष्ठ पोलीस निरीक्षक | भरत आत्माराम भोईटे |
| पोलीस निरीक्षक | विनय गुलाबराव पाटणकर |
| पोलीस उप निरीक्षक | मारुती बळीराम शेळके |
| पोलीस उप निरीक्षक | प्रशांत मोहन कांबळे |
| पोलीस उप निरीक्षक | रामदास तात्याबा कदम |
| पोलीस निरीक्षक | सरला सत्तारसिंग वसावे |
| सहा. पोलीस निरीक्षक | विजयकुमार आर. अंबरगे |
| पो.शि.क्र.०६११३६ | संतोष बबन पवार |
| पो.शि.क्र.०९०७०१ | संदीप पंडीत शिंदे |
| पो.शि.क्र.०९१६९० | राहुल निवृत्तीराव गजभरे |
| पो.ह.क्र.१७२६ | जयेंद्र गणपत सूर्वे |
| पो.ना.क्र.९७११४१ | धर्मेंद्र विजय जुवाटकर |
| पो.ना.क्र.९८०५४५ | अशोक भिमाजी फड |
| पो.शि.क्र.०४५१२ | राकेश सुरेश कदम |
| पो.शि.क्र.०३५६५ | विनोद विठोबा पवार |
| पो.शि.क्र.०७१०५८ | विकास जयवंत मोरे |
| पो.शि.क्र.०६१७२८ | राजेश मधुकर दोधाडे |
| पो.शि.क्र.०९३५७६ | राहुल आण्णा चतूर |
| मपो.शि.क्र.०८१४०६ | पूनम श्रावण गंभिरे |
| मपो.शि.क्र.९२७७५७ | सुनिता अशोक कांबळे |